जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 2 MAY 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठात ॲथलेटिक्स प्रशिक्षण शिबिर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे २२ ते ३१ मे या कालावधीमध्ये वय वर्षे ७ ते १५ या वयोगटातील विद्यार्थी खेळाडूसाठी उन्हाळी सुटीतील मोफत क्रिकेट आणि ॲथलेटिक्स प्रशिक्षण शिबिर क्रीडा महर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेले आहे. या शिबिरामध्ये खेळाडूंना क्रिकेट आणि ॲथलेटिक्सचे मूलभूत प्रशिक्षण मोफत देण्यात येणार आहे. ॲथलेटिक्स या खेळाचे प्रशिक्षण व मार्गदर्शन डॉ. पी. टी. गायकवाड, जे. एच. इंगळे हे करणार आहेत. अधिक माहितीसाठी क्रीडा अधिविभागाचे शशिकांत दाभाडे यांच्याशी संपर्क साधावा, असे अवाहन विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे करण्यात आले आहे.

2 2 MAY 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क'ची 'समर यूथ समीट' उद्यापासून

कोल्हापूर, ता. २१ : करिअरचे असंख्य पर्याय उपलब्ध होत असताना, यशाच्या वाटा शोधणाऱ्या तरुणांसाठी विविध क्षेत्रांमध्ये यशस्वी ठरलेल्या व्यक्तींबरोबर थेट संवाद साधण्याची संधी 'डिलिव्हरिंग चेंज फाउंडेशन'च्या 'यंग इंस्पिरेटर्स नेटवर्क' (यिन) व्यासपीठाने आणली आहे. युवकांसाठी 'यिन' करत असलेल्या उपक्रमांचा भाग म्हणून होणाऱ्या तीन दिवसांच्या 'यिन समर यूथ समीट २०१७' मध्ये उद्योग, राजकारण, डिजिटल ऑनलाईन मार्केटिंग, टीम बिल्डिंग, शेअर मार्केट, स्टार्ट अप, खेळ, नवीन तंत्रज्ञान आदी विषयांवर चर्चा होणार आहे.

दरम्यान, स्पेक्ट्रम ॲकॅडमी प्रस्तुत आणि नीलया एज्युकेशन ग्रुप पॉवर्ड बाय असणाऱ्या या शिबिरासाठी श्री महालक्ष्मी अन्नछत्र सेवा ट्रस्ट आणि विद्याप्रबोधिनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांचे सहप्रायोजकत्व मिळाले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने ही समिट होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवनात होणाऱ्या समीटचे उद्‌घाटन मंगळवारी (ता. २३) सकाळी ११ वाजता होणार आहे. कोल्हापूर महापालिकेचे आयुक्त अभिजित चौधरी यांच्या हस्ते उद्‌घाटन होईल. तीन दिवसांत होणाऱ्या विविध सत्रांमध्ये सुजय खांडगे (डिजिटल मार्केटिंग), नीलया ग्रुपचे संस्थापक नीलय मेहता (लाईफ स्किल व टीम बिल्डिंग), नागपूर येथील उद्योजक जयसिंग चौहान (उद्योजकता),

पान २ वर »

## प्रमुख वक्ते


सुनील पाटील


सुजय खांडगे


राम गुडगिला


जयसिंग चौहान




## मार्गदर्शक वक्ते असे :

उद्योजक जयसिंह चौहान, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, याहूज् डिजिटल मार्केटिंगचे संस्थापक सूजय खांडगे, नीलय मेहता, विटो अल्बट्रो, स्पेक्ट्रम ॲकॅडमीचे सुनील पाटील, प्रसिद्ध जाहिरातकार अनंत खासबारदार, मानसोपचार तज्ज्ञ संतोष इंगळे, अपर पोलिस अधीक्षक सुहेल शर्मा, आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू रेश्मा माने, प्रसिद्ध दुर्गअभ्यासक डॉ. अमर अडके.

## विद्यार्थ्यांसाठी निवास व भोजन व्यवस्था

समीटमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी सोमवारी (ता. २२) सायंकाळी ६ वाजेपर्यंत 'सकाळ'च्या स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधावा. शिबिरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची भोजन व्यवस्था केली जाणार आहे. बाहेरगावच्या विद्यार्थ्यांची निवासाची व्यवस्थाही केली जाईल. तसेच, सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहेत. मर्यादित जागा असल्याने प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर नोंदणी केली जाईल.



ज्या तरुणाईच्या जोरावर आपण समर्थ भारताचे स्वप्न पाहत आहोत. तीच तरुणाई 'यिन'च्या 'समर यूथ समीट'च्या माध्यमातून एकवटणार आहे. नवप्रेरणांचा खळाळणारा झरा असणाऱ्या या तरुणाईला योग्य दिशा देण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

- राहुल चिकोडे, अध्यक्ष- विद्याप्रबोधिनी



हल्लीची तरुणाई बिघडली, अशी वारेमाप चर्चा होत असली तरी प्रत्यक्षात अनेक विधायक कामांत तरुणाईनेच पुढाकार घेतल्याचे दिसते. या तरुणाईला याच वयात विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांशी संवाद साधता येणार असून त्यांच्यासाठी हा उपक्रम पर्वणी असेल.

- राजू मेवेकरी, अध्यक्ष- महालक्ष्मी अन्नछत्र

**'यिन समर यूथ समीट'**

केव्हा - मंगळवार (ता. २३) ते गुरुवार (ता. २५)
सकाळी ९ ते सायंकाळी ६

कुठे : वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

(अधिक माहितीसाठी संपर्क- सूरज- ९९७०८७६९७२, सुशांत- ८८८८१६६११४.)